| MHRG170016572019 | दाखल दिनांक | : | २४/०७/२०१८ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २४/०७/२०१८ | | |
| | निकाल दिनांक | : | २१/०४/२०२५ | | |
| | कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | | ०६ | ०८ | २८ |

## फॉर्म नं.XXXII

## भाग 'अ'

## (न्यायनिर्णयाचे शिर्ष पान)

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४(i)]

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पनवेल–रायगड यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – एस. आर. चव्हाण)**

**न्यायनिर्णय घोषित दिनांक २१/०४/२०२५**

**सत्र खटला क्रमांक ३९३/२०१९**

**निशाणी क्र. ३३/अ**

गुन्हा भारतीय दंड विधान कलम ३१३, ३२३ व ५०४ प्रमाणे

गुन्हा नोंद क्रमांक ५६/२०१८ पनवेल तालुका पोलीस ठाणे.

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे, पनवेल तालुका पोलीस ठाणे. |
| सरकारी अभीयोक्ता | श्री. राजेंद्र येरुणकर |
| आरोपी | बाबा हारुन पटेल<br>वय – ३२ वर्षे, व्यवसाय – वाहन चालक,<br>रा. सध्या रा. वावंजे, ता. पनवेल, जि.रायगड.<br>मुळ रा. हासनापुर, पो. खटीसांगवी,<br>ता. गुलबर्गा, जि. गुलबर्गा, राज्य कर्नाटक. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | विधीज्ञ श्री. अंकित बंगेरा |

**भाग –ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | – | २४/०३/२०१८ |
| प्रथम खबर दाखल दिनांक | – | २६/०३/२०१८ |
| दोषारोप पत्र पाठविल्याचा दिनांक | – | २२/०५/२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | – | ०४/१२/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | – | ०९/०४/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | – | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | – | २१/०४/२०२५ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | – | –– |

**<u>आरोपीची माहिती</u>**

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाबा हारुन पटेल | २६/०३/१८ | १९/१२/१८ | भारतीय दंड विधान कलम ३१३, ३२३ व ५०४ अन्वये | निर्दोष मुक्तता | – | – |

## भाग – क

## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये )

## सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

### अ. अभियोग पक्ष

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | हुसेन मेहताब अली शेख | फिर्यादी | १९ |
| २. | बिजान हुसेन शेख | पिडीत साक्षीदार | २२ |
| ३. | संजय बंकट चव्हाण | तपासी अधिकारी | २५ |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :–

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक. | निरंक. |

### क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास :–

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक. | निरंक. |

## अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी

### अ.अभियोग पक्ष :–

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि.पी.२०/सा.क्र.१ | फिर्यादवरील स्वाक्षरी |
| २. | नि.पी.२१/सा.क्र.१ | एफ.आय.आर. वरील स्वाक्षरी |
| ३. | नि.पी.२६/सा.क्र.३ | फिर्याद |

| | | |
|---|---|---|
| ४. | नि.पी.२७/सा.क्र.३ | एफ.आय.आर. |
| ५. | नि.पी.२८/सा.क्र.३ | घटनास्थळ पंचनामा |
| ६. | नि.पी.२९/सा.क्र.३ | सा.क्र.२ पिडीता यांचे जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ'. |
| ७. | नि.पी.३०/सा.क्र.३ | पिडीताचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

**ब. बचाव पक्ष :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरूप** |
|---|---|---|
| ०१. | निरंक. | निरंक. |

**क. न्यायालय निशाणी –**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | १२ | दोषारोप |
| २ | ३२ | आरोपीचे फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे निवेदन |

**ड. भौतिक वस्तू –**

| **अ.क्र.** | **मुद्देमाल आर्टिकल क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | – | – |

# न्यायनिर्णय

**(घोषीत दिनांक २१/०४/२०२५)**

**०१.** आरोपी यांचेविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३१३, ३२३ व ५०४ अन्वये दोषारोप ठेवून प्रस्तुत खटला चालविण्यात आला आहे.

**०२.** सरकार पक्षाची थोडक्यात हकिकत अशी आहे की, फिर्यादी हुसेन मेहताब अली शेख हे मागील २० वर्षांपासून त्यांची पत्नी मुलांसह भारत कंपाऊड वावंजे येथे राहत आहेत. त्यांची पत्नी बिजान ही तीन महिन्यांची गरोदर होती. बाबा पटेल हा फिर्यादी यांचेसोबत कॅल्गॉज कंपनीमध्ये कामास होता. बाबा पटेल यांची पत्नी शमा ही फिर्यादीची पत्नीचे बाब पटेल यांचेसोबत अनैतिक संबंध असल्याचे सांगत होती. त्यामुळे फिर्यादीची पत्नी बिजान दिनांक २४/०३/२०१८ रोजी रात्री ८.०० वाजता बाबा पटेल यांची पत्नी शमा हिच्याकडे जाब विचारणेस गेली होती. तेव्हा फिर्यादीची पत्नी व शमामध्ये शिवीगाळ झाली. बाबा पटेल यास त्याचा राग आल्याने बिजान हिच्या पोटावर लाथाबुक्यांनी मारहाण केली व शिवीगाळ केली. त्यामुळे ती गंभीर जखमी होवून तिला रक्तस्त्राव होवू लागला. स्थानिक डॉक्टरांकडे उपचार घेतले. परंतु त्याने फरक न पडल्याने बिजानला दिनांक २५/०३/२०१८ रोजी रात्री ९.०० वाजता जिवनज्योत हॉस्पीटल येथे उपचारासाठी दाखल केले. परंतु, सदर उपचारादरम्यान तिचा गर्भपात होवून ती बेशुध्द झाली होती. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपी बाबा पटेल यांच्याविरुध्द पनवेल तालुका पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.५६/२०१८ ने भारतीय दंड विधान कलम ३१३, ३२३ व ५०४ अन्वये फिर्याद दाखल केली.

**०३.** सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरिक्षक संजय बंकट चव्हाण यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला, पिडीताचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले व तपासाअंती आरोपी यांचेविरूद्ध पुरेसा पुरावा मिळून आल्यामुळे दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** उभयपक्षांचा युक्तीवाद व सरकारपक्षातर्फे दाखल कागदपत्रांचा विचार करुन माझे विद्वान पूर्वाधिकारी यांनी आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३१३, ३२३ व ५०४ अन्वये गुन्हयांचा दोषारोप नि.क्र.१२ वर निश्चित

केला. आरोपीने गुन्हा अमान्य करुन संपरिक्षा घेण्याची विनंती केली.

**०५.** अभियोगपक्षाने एकूण तीन साक्षीदार तपासले आहेत. आरोपी यांचेविरुध्द दाखल पुरावा त्यांना समजावून त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निशाणी ३२ कडे निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीने कोणताही गुन्हा केला नसल्याचा त्यांचा बचाव आहे व अभियोगपक्षाची सर्व कथने आरोपी यांनी नाकारली आहेत.

**०६.** अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.राजेंद्र येरुणकर व आरोपीचे विधिज्ञ श्री.अंकित बंगेरा यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप, अभिलेखावर उपलब्ध असलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा यांचे अवलोकन करुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण झाले असून त्यावरील निष्कर्ष कारणासह मी खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, दिनांक २४/०३/२०१८ रोजी, रात्री ८.०० वाजता, फिर्यादीची पत्नी ही तीन महिन्यांची गर्भवती असताना आरोपीने इच्छापूर्वक तिचे पोटात लाथ मारली व तिचे संमतीशिवाय तिचा गर्भपात करणेस कारणीभूत ठरला म्हणून आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३१३ खालील अपराध केला आहे ? | .... नाही. |
| २. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो का की, आरोपीने फिर्यादीचे पत्नीचे पोटात लाथ मारुन इच्छापूर्वक तिला दुखापत करुन आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३२३ खालील अपराध केला आहे ? | ... नाही. |
| ३. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो का की, आरोपी | |

| | | |
|---|---|---|
| | यांनी फिर्यादीची पत्नी ही प्रक्षुब्ध होवून तिने सार्वजनिक शांततेचा भंग करावा अथवा तिचे हातून कोणतातरी अपराध घडावा या हेतूने तिला शिवीगाळ करुन अपमानित केले म्हणून आरोपीने भारतीय दंड विधान कलम ५०४ खालील अपराध केला आहे ? | ... नाही. |
| ४. | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**०७.** आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण तीन साक्षीदार तपासले आहेत. नि.क्र. ३१ कडे पुरावा बंद पुरसीस देवून अभियोगपक्षाने त्यांचा पुरावा बंद केला आहे.

### मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता –

**०८.** सदर प्रकरणातील मुद्दे क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने व समान पुराव्यावर अवलंबून असल्याने सदर मुद्दे एकत्रीत विचारात घेत आहे.

**०९.** अभियोग पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकिल श्री. राजेंद्र येरुणकर यांनी असा युक्तिवाद केला की, आरोपी व सदर केसमधील साक्षीदार हे मुळचे गुलबर्गा, जिल्हा कनार्टक येथील असून ते एकाच समाजातील व एकाच गावातील आहेत. त्यामुळे साक्षीदारांनी आरोपीविरुध्द साक्ष दिली नाही. परंतु, तपासी अधिकारी यांच्या पुराव्यात असे आले आहे की, फिर्यादीच्या सांगणेप्रमाणे फिर्याद दाखल करणेत आली होती. आरोपीने पिडीताचे पोटावर लाथ मारल्याने तिचा गर्भपात झाला आहे असे निष्पन्न झाल्यानंतर तपासी अधिकारी यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र पाठविले. सदर तपासी अंमलदार यांची साक्ष ग्राहय

धरणेत यावी व आरोपीस जास्ती जास्त शिक्षा करणेत यावी.

१०. याउलट, आरोपीचे विद्वान वकिल श्री. अंकित बंगेरा यांनी युक्तिवाद केला की, आरोपीला शिक्षा देणेइतपत अभिलेखावर कोणताही पुरावा नाही. केवळ तपासी अधिकारी यांच्या साक्षीवर विसंबून आरोपीला दोषी धरता येणार नाही. आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र आहे.

११. आरोपी यांनी फिर्यादीची पत्नी बिजान यांचे पोटावर लाथ मारल्याने तिचा गर्भपात झाला आहे अशी अभियोगपक्षाची केस आहे. सदर केसमधील घटनास्थळ पंचनामा नि.पी.२८/सा.क्र.३ व वैद्यकीय प्रमाणपत्र नि.पी.३०/ सा.क्र.३ हे आरोपी यांनी मान्य केले आहेत. सदर वैद्यकीय प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता पिडीत बिजान हिला जिवनज्योत हॉस्पीटल येथे दिनांक २५/०३/२०१८ रोजी दाखल केले होते. तिच्या पोटावर मार लागल्यामुळे तिचा गर्भपात झाल्याचे सदर प्रमाणपत्रामध्ये नमूद आहे. परंतु, आरोपीने पिडीत बिजान हिच्या पोटावर लाथ मारल्याचे अभिलेखावर कोणताही पुरावा उपलब्ध नाही. अभियोगपक्षाने पिडीताचे पती हुसेन फिर्यादी सा.क्र.१ व पिडीत बिजान सा.क्र.२ यांना तपासले आहे. त्याच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, एकेदिवशी वावंजे येथील त्यांच्या घरासमोर गोंधळ चाललेला होता. त्यावेळी बिजान हिस धक्का लागला होता. त्यानंतर तिला जिवनज्योत हॉस्पीटल येथे घेवून गेले तेव्हा तिचा गर्भपात झाला होता. परंतु, दोन्ही साक्षीदारांनी आरोपीने धक्का दिला होता अथवा पोटावर लाथ मारली होती असे साक्षीमध्ये सांगितले नाही. केवळ, तपासी अंमलदार सा.क्र.३ यांनी सांगितल्यावरुन आरोपीविरुध्द दोष सिध्द होत नाही. तपासी अंमलदार हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत.

१२. एकंदरित अभिलेखावरील उपलब्ध पुरावा हा आरोपीला दोषी धरण्याइतपत नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा संशयापलिकडे सिद्ध केला नाही. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश

पारित करत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | आरोपी बाबा हरुन पटेल यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) नुसार भारतीय दंड विधान कलम ३१३, ३२३ व ५०४ या गुन्हयांतून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | आरोपी यांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रक्कम रुपये ५०,०००/– चा जातमुचलका व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा. |
| ४. | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ प्रमाणे सदर न्यायनिर्णयाची एक प्रत जिल्हा दंडाधिकारी, रायगड–अलिबाग यांच्याकडे पाठविण्यात यावी. |
| (सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.) | |

SANTOSH RAMU CHAVAN

Digitally signed by SANTOSH RAMU CHAVAN
Date: 2025.04.22 15:22:17 +0530

पनवेल. (एस. आर. चव्हाण)

दिनांक –२१/०४/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

पनवेल – रायगड.